# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


अत्यंत महत्वाचे/कालमर्यादित

जा.क्र.विकाऔ/शिक्षण/२०१९/ 149

दिनांक : 13 JAN 2020

प्रति,

**संचालक / प्राचार्य**

सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विना अनुदानित

पदविका व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,

औरंगाबाद विभाग.

विषय : **अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०१९-२० अंतर्गत (AISHE) या संकेतस्थळावर माहिती भरणे बाबत...**

संदर्भ १ उच्च शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०१९-२०/१६५८९ दिनांक ३०/१२/२०१९.

२ मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. ०३/तंशिसं/एआयएसएचई/२०२०/१२ दिनांक ०७/०१/२०२०.

उपरोक्त विषयीच्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदविका संस्थांना कळविण्यात येते की, अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०१९-२० अंतर्गत संकेतस्थळावर नोंदणी करणे व माहिती भरणे व **DCF-III** फार्म अपलोड करणे बाबत यापुर्वी सुचित केले होते. सदंर्भ क्र. १ अन्वये उच्च शिक्षण संचालनालयाने कळविल्यानूसार "https://aishe.nic.in" या संकेतस्थळावर सर्वेक्षणाची सन २०१९-२० ची माहिती भरण्याची सुविधा दिनांक ०१/०१/२०२० पासून सुरु करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदविका संस्थांनी आपल्या संस्थेची नोंदणी **(AISHE)** संकेतस्थळावर झाल्याबाबतची खात्री करुन घ्यावी. तसेच माहिती भरणे व **DCF-III** फार्म अपलोड करणेबाबतची कार्यवाही दिनांक २०/०१/२०२० पुर्वी पुर्ण करावी.

**AISHE** संकेतस्थळावर माहिती न भरल्यामुळे संस्था किंवा विद्यार्थी कोणत्याही शासकीय लाभापासून वंचित राहिल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहिल, याची गंभीरतेने नोंद घ्यावी.

सदर माहिती भरताना अडचणी आल्यास उच्च शिक्षण संचालनालय, म.रा.पुणे ४११ ००१ यांच्याशी **stat.dhepune@nic.in** या ई-मेलवर अथवा (०२०) - ६५००११७३ / ६५००१०१६ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. **सदर कार्यवाही विहीत मुदतीत पुर्ण करण्याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी व त्याचा अहवाल सोबतच्या प्रपत्रात या कार्यालयास सादर करावा.**

सोबतः प्रपत्र

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

(महाविद्यालयांकडून माहिती भरल्याबाबत प्राप्त करावयाचे प्रमाणपत्र)

## -: प्रमाणपत्र :-

प्रमाणित करण्यात येते की, अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम **(AISHE)** सन २०१९-२० या वेबपोर्टलवर ..........................................................................

...................................हया महाविद्यालयाची शैक्षणिक व शैक्षणिककेत्तर बाबींची सर्व माहिती अपलोड केली आहे. सदरील माहितीची पडताळणी करण्यात आली असून ती बरोबर व वैध असल्याचे आढळून आले आहे. त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी आहे.

दिनांक :-

ठिकाण :-

(स्वाक्षरी)
प्राचार्य
संस्था क्र./
महाविद्यालयाचे नांव व सील

---